# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट)ला दि. १ सप्टेंबर, २०१८ पासून लागू होणारा वीज दर

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) ही मुंबई शहरात विजेचे वितरण करणारी एक परवानाधारक आहे. बेस्टची आर्थिक वर्ष २०१५-१६, २०१६-१७ करिता एकूण महसुली गरजेचे अचूक समायोजन (truing-up), २०१७-१८करिता एकूण महसुली गरजेचे तात्पुरते अचूक समायोजन (provisional truing-up), आणि आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० या कालावधीसाठी सुधारित एकूण महसुली गरज आणि वीज दरास मंजुरीसाठीची याचिका दि. २८ जून, २०१८ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दाखल करुन घेतली.

आयोगाने या याचिकेवर जनतेकडून लेखी सूचना मागविल्या आणि दि. १ ऑगस्ट, २०१८ रोजी सेंट्रम हॉल, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,कुलाबा, मुंबई, येथे जाहीर सुनावणी देखील घेतली. या जाहीर सुनावणीच्या प्रक्रियेनंतर, ज्यामध्ये ग्राहक प्रतिनिधींनी आणि ग्राहकांनी देखील भाग घेतला होता, आयोगाने, दि.**१२ सप्टेंबर २०१८** च्या आदेशाद्वारे आर्थिक वर्ष २०१८-१९ते २०१९-२० या कालावधीकरिता बेस्टची एकूण महसुली गरज आणि वीज दर निश्चित केला आहे. सुधारित वीज दर दिनांक १ सप्टेंबर, २०१८पासून अंमलात येतील.

आयोगाच्या या आदेशामधील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः

**वीज दर**

१) आयोगाने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० या कालावधीकरिता बेस्टची एकूण महसुली गरज आणि वीज दर खालील प्रमाणे निश्चित केला आहे.

(रक्कम रु. कोटीत)

| | तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|---|
| १ | बेस्टची अंदाजित एकूण महसुली गरज (रु. कोटीत) | ३,५०७.६१ | ३,३९४.३६ |
| २ | आयोगाने निश्चित केलेली एकूण महसुली गरज (रु. कोटीत) | ३,३३०.७५ | ३,४४०.०५ |
| ३ | तूट / (शिल्लक) (रु. कोटीत) | (२९८.५८) | (१४४.०१) |
| ४ | वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च) (रु. प्रति युनिट) | ७.१० | ७.०६ |

२) बेस्टच्या ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये सरासरी वीज दरातील एकूण ५ ते ७ टक्के कपातीचा आणि आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये आणखी २ ते ३ टक्के कपातीचा लाभ होईल.

३) राज्यातील विद्युत वाहनांना चालना मिळण्यासाठी, आयोगाने उच्च दाब आणि लघु-दाब व्होल्टेज पातळीवरील विद्युत वाहने (इव्ही) चार्जिंग स्टेशन्स करिता एक नवीन वर्गवारी निर्माण केली आहे. ज्याकरिता एकत्रित आकार रु. ६ प्रति युनिट आणि मागणी आकार रु. ७० प्रति केव्हीए प्रति महिना राहील. याशिवाय ते टाईम-ऑफ-डे (टीओडी) वीज दरासह पॉवर फॅक्टर प्रोत्साहन/दंडासाठी देखील पात्र असतील.

४) विद्यमान आदेशांची अंमलबजावणी पुढे चालू ठेवताना, अति उच्च-दाब (११०/१३२ केव्ही) व्होल्टेज पातळीवर वीज पुरवठा घेणाऱ्या रेल्वे, मेट्रो, मोनारेल्स आणि अन्य ग्राहकांना वहन आकार लागू राहणार नाहीत.

५) त्याशिवाय, कचरा व्यवस्थापन प्रक्रियेच्या सुविधेचे महत्त्व विचारात घेऊन, सदर ग्राहकाची वर्गवारी, विद्युत पुरवठा सार्वजनिक सेवा (शासकीय) आणि सार्वजनिक सेवा (अन्य), जसे असेल तसे, अशी करण्यात आली आहे, ज्यामुळे प्रति युनिट रु. ०.७० ची सूट मिळेल कारण पूर्वी ती वर्गवारी वाणिज्यिक होती. एखाद्या ग्राहकाच्या जागेमध्ये केवळ कचऱ्यातून निर्मितीसाठी कचऱ्यावरील प्रक्रिया /व्यवस्थापन सुविधा अस्तित्वात असेल तर

अशी जागा/ग्राहक वर्गवारीला असलेला वीज दर अशा सुविधेला लागू राहील. उदा. गृहनिर्माण सोसायटीतील अशा सुविधेला निवासी वीज दर लागू राहील.

६) आर्थिक व्यवहारांसह सर्व क्षेत्रांमधील अंकेक्षणासाठी (डिजिटायझेशन) शासनाने घेतलेल्या पुढाकारास अनुसरुन, आयोगाने, क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड, युपीआय, भीम, इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, मोबाईल वॉलेट इ. द्वारा मासिक विद्युत देयकांचा भरणा करणाऱ्या लघु-दाब वर्गवारीमधील ग्राहकांच्या मासिक विद्युत देयकामध्ये, प्रति महिना रु. ५००/- च्या मर्यादेच्या अधीन राहून, ०.२५ टक्क्यांची सूट (कर आणि जकात वगळून) दिली आहे. त्याशिवाय देयकांचा त्वरित भरणा करणाऱ्या ग्राहकांना त्वरित भरणा सूट (प्रॉम्ट पेमेंट डिस्काऊंट) मिळेल, ते त्यांच्या मासिक देयकामध्ये ०.५ टक्क्यांची सूट त्वरित सूट मिळण्यास पात्र राहतील.

७) एक विशेष बाब म्हणून 'तात्पुरता पुरवठा–धार्मिक'वर्गवारीला लागू असलेला वीज दर सर्कस उद्योगाला लागू राहील.

८) स्वतंत्र जागेत लॉण्ड्री/कपड्यांची इस्त्री करुन देण्याच्या सेवा उद्योगाची वर्गवारी आता लघु दाबु-उद्योग- तीन (उद्योग) अंतर्गत करण्यात आली आहे. यापूर्वी हा उद्योग वाणिज्यिक वर्गवारीमध्ये समाविष्ट होता आणि यामुळे वीज दरात प्रति युनिट सुमारे रु. ०.७५ ची घट होईल.

९) स्थिर आकारांमधून स्थिर खर्चाच्या वसुलीत वाढ होण्यासाठी स्थिर/मागणी आकारांमध्ये हळूहळू वाढ करणे सुरु ठेवण्यात येईल.

१०) लोड फॅक्टर प्रोत्साहन आणि पॉवर फॅक्टर प्रोत्साहन यांचे सुसुत्रीकरण करण्यात आले आहे.

११) आयोगाने निरनिराळ्या ग्राहक वर्गवारी अंतर्गत असणारी क्रॉस सबसिडीची पातळी, म्हणजे ग्राहकांची एक वर्गवारी दुसऱ्या वर्गावारीला किती मर्यादेपर्यंत

क्रॉस-सबसिडी देईल किंवा घेईल, ही विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज दर धोरणाला अधीन राहून ठरविली आहे.

**परिवहन विभागाचा तोटा आणि ‘परिवहन विभाग तोटा वसुली (टीडीएलआर) आकार’**

१२) मागील बहु-वर्षीय वीज दराच्या आदेशात आयोगाने, बेस्टने आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० मध्ये करावयाच्या वर्गवारी-निहाय परताव्याची रक्कम निश्चित केली होती. ग्राहकांना आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये परत करावयाची रक्कम रु. ९३८.६९ कोटी तर आर्थिक वर्ष २०१९-२० ही रक्कम रु. ८५१.४४ कोटी होती. तथापि, हा परतावा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घेतला जाईल.

१३) आर्थिक वर्ष २०१८-१९ मधील विद्यमान आणि सुधारित वीज दराची तुलना **परिशिष्ट - १** मध्ये करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१९-२० करिता वर्गवारी-निहाय वीज दर **परिशिष्ट - २** मध्ये देण्यात आले आहेत. क्रॉस-सबसिडीच्या पातळीमध्ये वर्गवारी-निहाय करण्यात आलेल्या कपातीसह आयोगाने मान्यता दिलेला सुधारित सरासरी आकारणीचा दर आणि वर्गवारी-निहाय वीज दरातील वाढ/कपात **परिशिष्ट - ३** मध्ये दाखविण्यात आली आहे.

सदर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in आणि www.merc.gov.in या संकेत-स्थळावर पाहता आणि उतरवून घेता येईल.